नि.दिवाणी मु.क्र. ९८/२०२१
गिताबाई वि. रामकृष्ण
नि.क्र. १८

साक्षीदारचा उलट तपास प्रतिवादी तर्फे ॲड. श्री. आर.डी. वासनकर यांचेमार्फतः–

मला एक भाउ व तिन बहिणी आहेत. शशिकला ही माझी चौथ्या क्रमांकाची बहिण आहे. हे म्हणणे खरे आहे की, शशिकला ही लग्नाचे दोन वर्ष सासरी राहीली व वाद झाल्यानंतर माहेरी आली. शशिकलाबाईचे लग्न अंदाजे कधी झाले हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, माहेरी आल्यापासुन शशिकला ही भाउ रामकृष्णजवळ राहते. हे म्हणणे खरे आहे की, तिच्या औषधोपचार व इतर सर्व खर्च हा रामकृष्ण हाच करतो. हे म्हणणे खरे आहे की, रामकृष्ण हा अशीक्षित आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे तो सुरवातीपासुन माझे वडीलांसोबत शेतात काम करीत होता.

२. हे म्हणणे खरे आहे की, सन १९७८ मध्ये माझे वडीलांनी मौजे हिरुळ मधील सर्वे क्र. १२६ हे शेत घेतले तेव्हा माझा भाउ रामकृष्ण हा माझे वडीलांसोबतच काम करीत असे. हे म्हणणे खरे आहे की, सन १९९५ मध्ये पुन्हा माझे वडीलांनी एक शेत घेतले तेव्हा माझा भाउ माझे वडीलांसोबतच काम करीत असे. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडीलांनी पहिले शेत घेतले व त्यात उत्पन्न काढुन दुसरे शेत खरेदी केले. माझे लग्न कधी झाले ते मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे सर्व बहिणींचे लग्नाची जबाबदारी माझे भावाने रामकृष्ण याने पार पाडली. हे म्हणणे खरे नाही की, मी दहिगांव पुर्णा येथील नारायण वैद्य यांचेपासुन खरेदी करताना माझे भावाने मला पैसे दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, घराचे खरेदीवेळी रामकृष्ण हा हजर होता. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडीलांच्या म्हातारपणाचा सर्व उपचाराचा व इतर खर्च माझा भाउ रामकृष्ण याने केला.

३. हे म्हणणे खरे आहे की, रामकृष्ण जवळ शेती व्यतिरीक्त इतर कुठलेही कमाईचे साधन नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझी बहिण शशिकला ही आता म्हातारी आहे. हे म्हणणे खरे आहे की, तिचा सांभाळ सुध्दा रामकृष्णच करतो. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रकरण दाखल करण्यापुर्वी रामकृष्ण यांना नोटीस पाठविली नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत ही वडीलोपार्जीत असल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की दावा मिळकत ही माझे वडीलांनी व रामकृष्ण यांनी खरेदी घेतल्याने त्याच हिस्सा मागण्याचा मला अधिकार नाही. हे म्हणणे खरे आहे की, रामकृष्णकडे माझे जाणे–येणे बंद आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे आईने स्वतःचे हिस्याचे मृत्ःयुपत्र करुन ठेवले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी मागणी केल्याप्रमाणे वादजागेवर माझा कुठलाही हिस्सा नाही. हे म्हणणे खरे नाही की, रामकृष्ण यास शेतातील हिस्सा मागीतल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास पुर्ण.**

श्रवणोत्तर स्वीकृत.

माझे समक्ष,

दि. २८.०३.२०२३

**(जी.एम.नदाफ)**
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
चांदुर बाजार.